# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172**


**No,CGRF/AZ/R / 191 / 2009 / 25 /** **Date :-**

To,
The Executive Engineer ( Administration)
O/O Superintending Engineer ,
O&M Rural Circle , M.S.E.D.C.L.,
Aurangabad.

Sub:- Forwarding of grievance in respect Shri Sudhakar Bajrang Chavan, Shriram Colony, Waluj, Tq.Gangapur,Dist.Aurangabad. (Consumer No. 506560008644).

Dear Sir,

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Shri Sudhakar Bajrang Chavan, Shriram Colony, Waluj, Tq.Gangapur,Dist.Aurangabad.

You are requested to submit your para wise reply on the grievance within 15 days from the date of receipt of this letter along with related documents.

The hearing in this matter is kept on 24/03/2009 at 12=00 Hrs.

Encl: As above

**Member/Secretary**
**CGRF(AZ) MSEDCL**
**Aurangabad.**

**Copy to:-**
Shri Sudhakar Bajrang Chavan,
Shriram Colony, Waluj,
Tq.Gangapur,
Dist.Aurangabad.

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/आर/१९१/२००९/२५**

**तक्रार दाखल दिनांक ;- ०६/०३/२००९**
**निकाल दिनांक ;- ०२/०५/२००९**

**श्री सुधाकर बजरंग चव्हाण,**
**श्रीराम कॉलनी,वाळुज,**
**ता. गंगापुर जिल्हा. औरंगाबाद.**

**अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्रामीण विभाग औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडीया** | **सदस्य** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

# आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक ०६/०३/२००९ रोजी औरंगाबाद ग्रामीण मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक २४/०३/२००९ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदार यांनी महावितरण कंपनीकडुन घरगुती वापरासाठी वीज पुरवठा घेतला असुन ऑक्टोबर २००८ मध्ये तांत्रीक बिघाडामुळे त्यांच्या मीटरवरील रिडींगमध्ये मोठी वाढ झाली. जानेवारी २००९ मध्ये त्यांना ६९०९०/- रुपयाचे बिल आकारण्यात आले व हे वीज बिल न भरल्यामुळे कोणतीही पुर्वसुचना न देता त्यांचा वीज पुरवठा खंडीत करण्यात आला. अर्जदाराने चुकीच्या वीज बिलाबाबत केलेल्या तक्रारीची दखल न घेण्यात आल्यामुळे त्यांने मंचात ही तक्रार दाखल केली असुन व्याज व दंड न आकारता सुधारीत वीज बिल देण्याची तसेच वीज पुरवठा पुर्नजोडणी करुन देण्याबाबत महावितरण वीज कंपनीस आदेश देण्याची विनंती मंचास केली आहे.

२) दिनांक २४/०३/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार श्री चव्हाण उपस्थित होते.नोडल अधिकारी कु.एस.बी.चिवंडे तसेच सहाय्यक अभियंता श्री ए.आर.पाटील उपस्थित होते.नोडल अधिकारी यांनी सुनावणीची तारीख पुढे वाढविण्याची विनंती मंचास केली.अर्जदाराने मीटर टेस्टींगची रक्कम रुपये १००/- भरली असल्याचे व त्याचा वीज पुरवठा २३/०२/२००८ रोजी खंडीत करण्यात आला असल्याचे व नंतर २४/०३/२००९ तसेच पुर्नजोडणी करुन देण्यात आल्याचे सांगितले मंचाने अर्जदारास वीज पुरवठा त्यांने मंचात दाखल केलेल्या तक्रारीचे निवारण होईपर्यंत खंडीत न करण्याचे आदेश नोडल अधिकारी यांना दिला व या प्रकरणाची पुढील सुनावणी दिनांक ०८/०४/२००९ रोजी घेण्याचे ठरविले.

३) दिनांक ०८/०४/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार उपस्थित होते. नोडल अधिकारी यांचा अधिकृत प्रतिनिधी एस.व्ही.जोशी उपस्थित होते.त्यांनी अर्जदाराच्या तक्रारीवर मंचात जवाब दाखले केला. नोडल अधिकारी प्रतिनिधीने अर्जदारास चुकीचे बिल देण्यात आल्याचे मान्य करीत वीज बिल रिव्हीजन प्रस्ताव मंचात दाखल केला ज्याची प्रत अर्जदारास देण्यात आली. अर्जदाराने सुधारीत वीज बिल प्रस्ताव व्याज व दंड कमी करण्यात आले नसुन त्यांनी २०/०८/२००८ रोजी भरलेल्या रुपये १०००/- रक्कमेची वजावट करण्यात आली नसल्याचे सांगितले.मंचाने दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकल्यानंतर प्रकरण निकासाठी ठेवले.

४) अर्जदार व नोडल अधिकारी यांच्या तर्फे दाखल करण्यात आलेल्या कागदपत्रावरुन व मंचासमोर झालेल्या सुनावणीवरुन असे आढळुन येते की, अर्जदाराने घरगुती वापरासाठी वीज पुरवठा घेतला असुन त्याच्या येथे बसविण्यात आलेल्या मीटर चा क्रमांक ९००१५३९०२३ असा आहे.एप्रिल २००७ ते सप्टेबर २००७ या काळात ३६२-०२=३६० युनीट बिल वापराची नोंद या मीटरवर आलेली दिसुन येते.सी.पी.एल प्रमाणे सप्टेंबर २००७ पर्यंत अर्जदारास मीटर रिडींग प्रमाणे योग्य देयक झाल्याचे दिसुन येते.ऑक्टोबर २००७ मध्ये महावितरण कंपनीतर्फे अर्जदारास मागिल रिडींग ३६२ व चालु रिडींग २०३७ दर्शवित १६७५ युनीट वीज वापराची बिल देण्यात आल्याचे तसेच त्यापुढील काळात फेब्रुवारी २००९ पर्यंत त्यांना सरासरीवर आधारीत वाढीव वीज बिल देण्यात आल्याचे दिसुन येते. दिनांक २९/०३/२००८ रोजी अर्जदाराचे हे मीटर बदलण्यात आले व त्याजागी नवीन ३४१८५० या क्रमांकाचे मीटर लावण्यात आले.नोडल अधिकारी यांनी दाखल केलेल्या जवाबात जुने मीटर हे फॉल्टी असल्याचे व रिडींग ही जपींग होत असल्याचे म्हटले आहे व मागिल वीज वापराच्या सरासरीवर व्याज व दंड न आकारता सुधारीत वीज बिल देण्याची तयारी दर्शविली आहे.जी योग्य असल्याचे मंचाचे मत आहे

वरील सर्वबाबीचे निरिक्षण केल्यावर मंच या प्रकरणी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१) महावितरण कंपनीतर्फे अर्जदारास ऑक्टोबर २००७ नंतर देण्यात आलेली सर्व वीज बिले रदद्‌ करण्यात येत आहेत.

२) महावितरण कंपनीने अर्जदारास वरील काळासाठी ५२ युनीट प्रति माह याप्रमाणे वीज बिल आकारावे व अर्जदारास ३० दिवसांत सुधारीत वीज बिल देण्यात यावे.

३) वरील प्रमाणे देण्यात येणा-या सुधारीत वीज बिलावर कोणतेही व्याज व दंड आकारण्यात येवु नये.

४) मीटर टेस्टिंग ची फी भरुन ही मीटर टेस्ट न केल्यामुळे भरलेली आकारणी रुपये १००/- महावितरण कंपनीने अर्जदारास परत करावीत.

५) अर्जदाराने वरील काळात भरलेल्या रक्कमेची वजावट सुधारीत वीज बिलातुन करावी.

६) महावितरण कंपीने अर्जदाराचा वीज पुरवठा खंडीत करुन दिलेल्या मानसिक त्रासापोटी रुपये ५००/- नुकसान भरपाई ३० दिवसांत द्यावे.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **प्र. अ. सगणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/आर/१९१/२००९/२५** **दिनांक ;-**

**प्रति,**
**श्री सुधाकर बजरंग चव्हाण,**
**श्रीराम कॉलनी,वाळुज,**
**ता. गंगापुर जिल्हा. औरंगाबाद.**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/आर/१९१/२००९/२५ )

आपण दिनांक ०६/०३/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

**प्रती, सविनय सादर,**
**मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय,**
**म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.**

**प्रती,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. ग्रामीण मंडळ, औरंगाबाद**
**माहिती व उचीत कारवाही करीता**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**